नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३०७ Issue - 307 | वार रविवार दि. २९ मार्च २०२६ Blow- Sunday Date 29 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात एलपीजीऐवजी पीएनजीचा पर्याय?

## मंत्री छगन भुजबळ; महाराष्ट्रात पीएनजी नेटवर्कच्या विस्तारासाठी केंद्र सरकारने आर्थिक व तांत्रिक पाठबळ द्यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू पुरवठा करणाऱ्या नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारने तांत्रिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. ही बैठक केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर (शहरी विकास व गृहनिर्माण) आणि हरदीप सिंग पुरी (पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू) यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशचे नगरविकास व अन्न नागरी पुरवठा मंत्री, केंद्रीय सचिव तसेच महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि विविध महानगरपालिकांचे आयुक्त व नैसर्गिक वायू कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी पीएनजी विस्तारासाठी राज्य सरकारने उचललेल्या क्रांतिकारी पावलांची माहिती दिली. ते म्हणाले की, अनेकदा शेजाऱ्यांची संमती न मिळणे किंवा महानगरपालिकेच्या रस्ते खोदाईच्या परवानग्यांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे गॅस पाईपलाइन टाकण्याचे काम रेंगाळते. ही अडचण दूर करण्यासाठी आता 'डीम्ड परमिशन' (गृहित परवानगी) तत्त्व लागू करण्यात आले आहे. यानुसार, पाईपलाइन टाकण्यासाठी विविध विभागांकडे परवानगी मागितल्यानंतर ठराविक वेळेत प्रतिसाद न मिळाल्यास, ती परवानगी मिळाली आहे असे समजून काम पुढे नेता येईल. तसेच, नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना 'भोगवटा प्रमाणपत्र' मिळवण्यासाठी पीएनजी जोडणी असणे आता बंधनकारक करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या सोसायट्यांमध्ये गॅस पाईपलाइन पोहोचली आहे, तिथे पालिकेच्या अटींनुसार जोडणी घेतल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील शहरांमध्ये एलपीजी सिलिंडरचा वापर कमी करून पीएनजीचे जाळे विस्तारण्यासाठी राज्य सरकार अधिक कठोर आणि गतिमान पावले उचलत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट आणि लघुउद्योगांसाठी पीएनजीचा वापर वाढवणे गरजेचे असून, यामुळे खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होईल. यासाठी परवाना व जोडणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या सूचना भुजबळ यांनी केल्या. गॅस वितरण संस्थांना आता २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात आली असून, त्यांच्यासाठी कामकाजाचा हंगामही शिथिल करण्यात आला आहे. तसेच, रस्ते पूर्ववत करण्यासाठी लागणारे शुल्क माफ करण्याच्या मार्गदर्शक सूचना कालच शासन निर्णयाद्वारे देण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासकीय समन्वय राखण्यासाठी



नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांना राज्याचे नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. हे आदेश ३० जून २०२६ पर्यंत अंमलात राहतील.

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत बोलताना मंत्री भुजबळ यांनी स्पष्ट केले की, राज्यातील रिफायनरींमध्ये पुरेसा साठा उपलब्ध असून प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर वाढवून एलपीजीची टंचाई भासणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. ग्रामीण भागात सिलिंडरचा पुरवठा पूर्वीप्रमाणेच सुरू राहील. तसेच, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्याला मिळणारा सुमारे ३,७६८ किलो लिटर रॉकेलचा कोटा दरमहा उपलब्ध करून दिला जात असून रेशन दुकानांमार्फत होणारा पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर दिला जात आहे. शेवटी, राज्यात पुन्हा टाळेबंदी (लॉकडाऊन) लागणार असल्याच्या अफवांचे खंडन करत, जनतेने कोणत्याही चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी केले.

## धक्कादायक! सरकारी रुग्णालयात दाखल ६ वर्षीय चिमुकल्याचे डॉक्टरने दुसरेच बोट काढले; चौकशीसाठी समिती गठीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सरकारी रुग्णालयातील अनास्था अनेकदा पाहायला मिळत असते, त्यानिमित्ताने सरकारी यंत्रणेचा चेहरा उघडा पडतो. कधी रुग्णालयात बेडची कमतरता असल्याने रुग्णांना खालीच झोपवण्यात येते. तर, कधी डॉक्टरच वेळेवर उपलब्ध नसल्याने रुग्णांचा ताटकळत बसावे लागते हेही चित्र अनेकदा पाहायला मिळत आहेत. आता, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका ६ वर्षीय चिमुकल्या मुलाचे बोट कापण्यासाठी तो रुग्णालयात आला असता, डॉक्टरांनी उजव्याऐवजी डाव्या हाताचे बोट काढल्याने कुटुंबीयांनी संताप व्यक्त केला आहे. याप्रकरणी, आता प्रशासनाकडून चौकशी देखील करण्यात येणार आहे. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयातील सावळा गोंधळ पुन्हा एकदा समोर आला असून एका सहा वर्षाच्या मुलाचे उजव्या हाताचे बोट काढायचे असताना महिला डॉक्टरने त्याच्या डाव्या हाताच्या बोटाचे ऑपरेशन करण्याचा महाप्रताप केला आहे. ही बाब समजतात संतप्त पालकांनी तक्रार केल्यानंतर आता प्रशासन खडबडून जागे झाले असून त्या महिला डॉक्टर विरोधात चौकशी समिती नेमणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र, सहा वर्षाच्या मुलाच्या शस्त्रक्रियेत अशा पद्धतीने झालेल्या हलगर्जीपणा मुळे उपजिल्हा रुग्णालयाची अब्रू गेली आहे. तर, चिमुकल्या मुलाचा हात आयुष्यभरासाठी बाधित झाला आहे.

उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका सहा वर्षे मुलाच्या शस्त्रक्रियेत उजव्या हाताऐवजी त्याचे डाव्या हाताचे बोट काढून टाकण्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. त्यामुळे, शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांचा हलगर्जीपणा पुन्हा एकदा पुढे आला आहे. शाहू सुनील दंदाडे या सहा वर्षीय मुलाला दोन्ही हाताला सहा बोटे आहेत. त्यातील उजव्या हाताचे बोट दुखत असल्याने ते काढून टाकण्याचा निर्णय डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर घेण्यात आला होता. या शस्त्रक्रियेसाठी मुलगा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल होता, दरम्यान चिमुकला मुलगा डॉक्टरांना कोणतं बोट काढायचं हे सांगत असतानाही त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन उजव्या ऐवजी डाव्या हाताचे बोट डॉक्टरांकडून काढण्यात आल्याची तक्रार दंदाडे कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासनाकडे केली आहे. याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली असून समितीच्या अहवालानंतर, कुणीही दोषी आढळल्यास योग्य ती कारवाई करणार असल्याचे वैद्यकीय अधीक्षकांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, उजव्याऐवजी डाव्या हाताचे बोट काढल्याच्या आरोपामुळे उपजिल्हा रुग्णालयातील नवीन प्रताप समोर आला आहे.

## भिवंडीत गॅस लायटर कंपनीला भीषण आग, संपूर्ण कंपनी जळून खाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : भिवंडी तालुक्यातील कल्याण पडघा रस्त्यावरील सापे ग्रामपंचायतीच्या हद्दीत धझच् गॅस लायटर कंपननीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या कंपनीत लाईटर बनवण्याचे काम केले जात होते. कंपनीत आग लागल्याची माहिती मिळताच कामगारांनी बाहेर पळाले. या आगीत संपूर्ण कंपनी जळून खाक झाली आहे.

शॉर्टसर्किटने आग लागण्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. भिवंडी कल्याण येथील अग्निशामक दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. कंपनीत काही बकरे बांधून ठेवण्यात आले होते ते आगीच्या भक्षस्थानी पडल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. दरम्यान, आगीची माहिती मिळताच कंपनीत असणारे सगळे कामगार बाहेर पडले. त्यामुळं मोठा अनर्थ टळला आहे. साताऱ्यातील सोनगाव कचरा डेपोच्या बाजूला असणाऱ्या द्रोण आणि पत्रावळी बनवणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागली आहे.सायंकाळच्या सुमारास ही आग लागली असून या मध्ये कारखान्यातील साहित्य जळून खाक झालं आहे.ही आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे कर्मचारी दाखल झाले असून आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.या आगी मुळे या कारखान्यातील साहित्य जळाल्याने मोठे नुकसान झाले आहे. भंडाऱ्याच्या साकोलीत बांबूच्या झाडांना भीषण आग लागल्याची घटना घडली आहे.

**परिषदेमुळे महाराष्ट्राला वैद्यकीय शिक्षणाचे राष्ट्रीय केंद्र बनवण्यास मदत - मंत्री हसन मुश्रीफ**

# पल्स २०२६ मुळे आरोग्य क्षेत्राला नवी दिशा; परिषदेत १५ सामंजस्य करार, ७२० कोटींची गुंतवणूक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'विकसित महाराष्ट्र २०४७' च्या दिशेने राज्याने आरोग्य क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे, पल्स २०२६ परिषदेमुळे आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान व संशोधन आणि नवकल्पनांना चालना मिळाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

वैद्यकीय व औद्योगिक क्षेत्राला चालना देणाऱ्या 'पल्स २०२६' परिषदेत जिओ वर्ल्ड सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एकूण १५ सामंजस्य करारांवर (चेणी) स्वाक्षऱ्या करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिली. या सामंजस्य करारावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्त अनिल भंडारी, पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दोन दिवस चाललेल्या या परिषदेत एकूण १५ सामंजस्य करार (चेणी) करण्यात आले. त्यापैकी ३ करारांद्वारे सुमारे ७२० कोटी रुपयांची गुंतवणूक निश्चित करण्यात आली, तर १२ करार धोरणात्मक भागीदारीचे होते. परिषदेत १०हून अधिक देशांतील १३० पेक्षा जास्त तज्ज्ञ आणि ३००० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला. ही केवळ परिषद आयोजित केली नाही, तर पुढील दशकात महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेची दिशा निश्चित करण्यात आल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यावेळी म्हणाले.

उद्योग विभागामार्फत करण्यात आलेल्या करारांमध्ये 'बल्क ड्रग्ज पार्क'साठी सॅव्वी केअर आणि फामक्स या कंपन्यांकडून एकत्रित ५२० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. तसेच निप्रो फार्मा पॅकेजिंग कंपनीने २०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा करार केला आहे. यामुळे राज्यातील औषधनिर्माण क्षेत्र अधिक बळकट होणार आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाअंतर्गत करण्यात आलेल्या कराराअंतर्गत रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्स




अँड सर्जन्स ऑफ ग्लासगो आणि युनिव्हर्सिटी ऑफ लीड्स यांच्यासोबत वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षणासाठी सहकार्य करार करण्यात आले. तसेच मँचेस्टर युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्याने क्रीडा औषधनिर्माण क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र उभारण्यात येणार आहे. कर्करोग व अत्याधुनिक उपचारांसाठी '४बेस केअर' सोबत कॅन्सर इंटेलिजन्स प्रकल्प, तर मेड्ट्रॉनिक सोबत 'स्ट्रोक सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्यासाठी करार करण्यात आले. यामुळे राज्यातील विशेष उपचार सुविधा अधिक सक्षम होणार आहेत.

पर्यटन व मानसिक आरोग्य क्षेत्रातही महत्त्वाचे करार झाले. सायप्रस चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री सोबत मेडिकल टुरिझमला चालना देण्यासाठी सहकार्य करार करण्यात आले असून, ग्रॅव्हिटस फाउंडेशनच्या माध्यमातून बाल मानसिक आरोग्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

या परिषदेदरम्यान वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन, एआय-आधारित शिक्षण, रोबोटिक शस्त्रक्रिया तसेच उद्योग-अॅकेडेमिया सहकार्य यावर सखोल चर्चा झाली. विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, आरोग्य संस्था आणि उद्योग क्षेत्रासोबत महत्त्वाचे करार करण्यात आले.

या करारानंतर मंत्री हसन मुश्रीफ आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

**परिषदेमुळे महाराष्ट्राला वैद्यकीय शिक्षणाचे राष्ट्रीय केंद्र बनवण्यास मदत - मंत्री हसन मुश्रीफ**

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून आयोजित पल्स २०२६ परिषदेमुळे महाराष्ट्राला वैद्यकीय शिक्षणाचे राष्ट्रीय केंद्र बनवण्यास, इनोव्हेशन हब विकसित करण्यास आणि हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राला चालना देण्यास मोठी मदत होणार असल्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, सार्वजनिक, खाजगी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांत तज्ज्ञ, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि औषध कंपन्यांसोबत दर्जेदार शिक्षण टिकवण्यासाठी व्यापक चर्चा झाली. एकूणच, पल्स २०२६ च्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण, गुंतवणूक आणि आरोग्य क्षेत्रातील हेल्थ सिटी संकल्पनेला बळकटी मिळाल्याचा विश्वास मंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला.

**पल्स २०२६ मुळे आरोग्य शिक्षण, गुंतवणूक आणि नवकल्पनांना चालना; 'महाराष्ट्र घोषणा'द्वारे पुढील दिशा स्पष्ट - राज्यमंत्री माधुरी मिसाळ**

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, आरोग्य शिक्षण मजबूत करणे ही केवळ सार्वजनिक आरोग्याची गरज नसून ती मोठी आर्थिक संधीही आहे. गुंतवणुकीच्या दृष्टीने निप्रो फार्मा पॅकेजिंगने २०० कोटी रुपये, फारमॅक्सने ४७० कोटी रुपये आणि डर्रीूलरीश ने ५० कोटी रुपयांची गुंतवणूक जाहीर केली. ही गुंतवणूक राज्यातील प्रस्तावित बल्क ड्रग पार्कमध्ये रॅमके इन्फ्रास्ट्रक्चर आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सध्या १७,००० हून अधिक वैद्यकीय शिक्षणाच्या जागा उपलब्ध असून, हे देशातील सर्वात मोठे वैद्यकीय शिक्षण नेटवर्क आहे. येथील विद्यार्थी अमेरिका, युनायटेड किंगडम, मध्यपूर्व आणि आग्नेय आशियामध्ये सेवा देत आहेत.

परिषदेत राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या व्हिजन २०३० वर चर्चा, एआय आधारित शिक्षण प्रणालीचे सादरीकरण, तसेच डॉ. मफ्फजल लकडावाला यांचे रोबोटिक शस्त्रक्रिया प्रात्यक्षिक यांसारखी महत्त्वाची सत्रे पार पडली. आर्टपार्क, ४ बेसकेअर, कुश्यबेबी आणि यशराज बायोटेक्नॉलॉजी यांसारख्या स्टार्टअप्सनीही सहभाग नोंदविला.

परिषदेत शेवटी महाराष्ट्र घोषणा सादर करण्यात आली, ज्यामध्ये हिंदूजा, बीरला, सीडको, एमआयडीसी, एमएमआरडीए यांसारख्या संस्थांचा सहभाग होता. एकूणच, पल्स २०२६ द्वारे महाराष्ट्राने आरोग्य क्षेत्रात गुंतवणूक, गुणवत्ता आणि नवकल्पना यांना गती देत विकसित महाराष्ट्र २०४७ च्या दिशेने ठोस पाऊल उचलले आहे.

# अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड वर्गीकरण : सामाजिक न्याय की शासनाचे सूक्ष्म षडयंत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय लोकशाहीत 'सामाजिक न्याय' हा केवळ शब्द नाही, तर तो संविधानाने दिलेला नैतिक आदेश आहे. पण हा आदेश प्रत्यक्षात किती पाळला जातो? अनुसूचित जातींना दिलेल्या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतो का, की तो काही मोजक्यांच्याच हातात केंद्रित झाला आहे? या पार्श्वभूमीवर अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येतो आणि एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. हे खरोखरच न्यायाचा विस्तार आहे, की समाजातील एकजूट कमकुवत करण्याचा सूक्ष्म राजकीय प्रयोग? अनुसूचित जाती हा एकसंध, समरूपी गट आहे, ही कल्पना वास्तवाशी विसंगत आहे. या वर्गात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर प्रचंड विषमता आहे. काही जातींनी शिक्षण, नोकरी आणि सत्तेच्या प्रवेशद्वारांवर आपली ठाम छाप निर्माण केली आहे; तर काही जाती अजूनही उपेक्षा, दारिद्र्य आणि संधीअभावी अंधारात चाचपडत आहेत. परिणामी, आरक्षणाचा लाभ काही मर्यादित गटांमध्येच केंद्रीत राहिल्याची टीका केवळ राजकीय नाही, तर सामाजिक वास्तवावर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर वर्गीकरणाचा विचार पुढे येणे स्वाभाविक आहे.



वर्गीकरणाचे समर्थक एक मूलभूत तत्त्व मांडतात, समानता म्हणजे सर्वांना सारखे देणे नव्हे, तर ज्यांना जास्त गरज आहे त्यांना अधिक देणे. ही भूमिका सामाजिक न्यायाच्या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. कारण आजही काही अनुसूचित जाती शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या मूलभूत संधींपासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत, जर आरक्षणाचा मोठा वाटा आधीच सक्षम झालेल्या घटकांकडेच गेला, तर उर्वरित घटकांसाठी न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरते. अ, ब, क, ड वर्गीकरणामुळे सर्वात मागासलेल्या घटकांना प्राधान्य मिळू शकते, आरक्षणाचे लाभ अधिक संतुलित रीतीने वाटले जाऊ शकतात आणि सामाजिक समावेशनाला खऱ्या अर्थाने चालना मिळू शकते. म्हणूनच काहींसाठी हे धोरण म्हणजे न्यायाच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

मात्र, या धोरणाकडे संशयाच्या नजरेने पाहणाऱ्यांची संख्या कमी नाही. त्यांचा सरळ आरोप आहे. हे वर्गीकरण म्हणजे अनुसूचित जातींच्या एकजुटीवर घाला घालण्याचा प्रयत्न आहे. इतिहास साक्षी आहे की, एकजूट असलेला समाज हा राजकीयदृष्ट्या प्रभावी असतो. त्यामुळे त्यात फूट पाडणे हे सत्ताधाऱ्यांसाठी सोयीचे ठरते. अ, ब, क, ड या वर्गीकरणामुळे जातींमध्ये स्पर्धा, असूया आणि संघर्ष वाढण्याची भीती व्यक्त केली जाते. याहून महत्त्वाचे म्हणजे वर्गीकरणाचे निकष कोण ठरवणार? त्यात पारदर्शकता असेल का? आणि सर्वात महत्त्वाचे राजकीय हस्तक्षेप टाळला जाईल का? हे प्रश्न अनुत्तरित राहिल्यास, हे धोरण न्याय नव्हे, तर नियोजित विभाजन ठरू शकते.

या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयानेही महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. राज्यांना उपवर्गीकरणाचा अधिकार असला, तरी तो ठोस, वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक आकडेवारीवर आधारित असला पाहिजे, असा स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिला आहे. घटनेतील कलम १४ आणि १६ यांचा विचार करता, कोणतेही वर्गीकरण हे तर्कसंगत आणि न्याय्य असले पाहिजे. अन्यथा, ते घटनाबाह्य ठरू शकते. यातून एक गोष्ट स्पष्ट होते. भावना, राजकारण आणि घोषणांपेक्षा तथ्य आणि पुरावे अधिक महत्त्वाचे आहेत. या संपूर्ण वादात सर्वात महत्त्वाचा आवाज कोणाचा आहे? तर तो तळागाळातील समाजाचा. अनेक अत्यंत मागासलेल्या जातींना वाटते की, आरक्षणाचा लाभ त्यांच्या दारात कधीच पोहोचला नाही. त्यांच्यासाठी वर्गीकरण म्हणजे पहिल्यांदाच दिसलेली संधी आहे. पण दुसरीकडे, काही प्रगत घटकांना भीती वाटते की, त्यांच्या मेहनतीने मिळवलेल्या संधींवर गदा येईल. त्यामुळे हा संघर्ष केवळ धोरणात्मक नाही; तो अस्तित्व, ओळख आणि स्वाभिमानाचा संघर्ष बनतो.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

कोणतेही धोरण त्याच्या उद्देशाने नव्हे, तर अंमलबजावणीने मोजले जाते. जर शासनाने पारदर्शकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निष्पक्षता यांचा अवलंब केला, तर हे वर्गीकरण खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे साधन ठरू शकते. पण जर त्यामागे मतांचे गणित, सत्तेची आकांक्षा आणि समाजात फूट पाडण्याचा हेतू असेल, तर हे धोरण लोकशाहीच्या आत्म्यालाच तडा देणारे ठरेल. या वादातून मार्ग काढण्यासाठी काही ठोस पावले आवश्यक आहेत. सर्वसमावेशक आणि अद्ययावत डेटा संकलन करावे. स्वतंत्र, निष्पक्ष आयोगाची स्थापना करणे. कालबद्ध पुनरावलोकनाची यंत्रणा आणि समाजातील विविध घटकांमध्ये संवाद आणि विश्वास निर्माण करणे. अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड वर्गीकरण हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही; तो भारतीय समाजाच्या नैतिकतेची परीक्षा आहे. जर हे धोरण खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय देणार असेल, तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे. पण जर ते समाजात फूट पाडण्याचे, राजकीय फायद्यासाठी वापरण्याचे साधन ठरणार असेल, तर त्याला ठाम विरोध करणे हीच खरी लोकशाही ठरेल. शेवटी, प्रश्न वर्गीकरणाचा नाही तर तो न्यायाच्या प्रामाणिकतेचा आहे आणि त्या प्रामाणिकतेची परीक्षा आता सरकारसोबतच संपूर्ण समाजालाही द्यावी लागणार आहे.

आज गरज आहे ती घोषणांची नाही, तर प्रामाणिकतेची. जर अ, ब, क, ड वर्गीकरणाच्या माध्यमातून खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय मिळणार असेल, तर त्याचे स्वागत करण्यास कुणालाही हरकत नसावी. पण जर हा प्रयोग समाजातील एकजूट खिळखिळी करून राजकीय फायद्याची पायाभरणी करण्यासाठी रचला गेला असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरेल. सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वंचितांना न्याय देणे म्हणजे केवळ धोरण आखणे नाही, तर विश्वास निर्माण करणे आहे आणि जर हा विश्वासच ढासळला, तर वर्गीकरणाचे हे गणित केवळ कागदावरच राहील; पण समाजात निर्माण होणारी दरी मात्र पिढ्यानपिढ्या भरून निघणार नाही.

## बोळदे येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : प्रतिनिधी

जवळच्या बोळदे येथे गावपातळीवर शेती प्रशिक्षण ज्ञआयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास श्री घनश्यामची ताराम संचालक, आदिवासी सोसायटी बाराभाटी हे अध्यक्ष स्थानी होते.

प्रमुख पाहुणे म्हणून सौ.कीर्ती टेंभुर्णे उपस्थित होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून मा. श्री विलास कोहाडे ,तालुका समन्वयक, श्री आदर्श मेश्राम, उप कृषी अधिकारी ,नवेगाव बांध, श्री निंबेकर कृषी सेवक तथा विलास गहाणे सहाय्यक कृषी अधिकारी, सौ.मनीषा शहारे, संगीता किरसान कृषीताई, उपस्थित होते. राष्ट्रीय नैसर्गिक शेती संबंधात उत्पादन खर्च कमी करणे व उत्पन्न वाढविणे त्यासाठी कुठल्याही रासायनिक निविष्ठांचा बाहेरून खर्च न करता घरच्या घरची बीजामृत, अमृतपाणी , दशपर्णी अर्क तयार करणे बाबत मार्गदर्शन मा.श्री विलास कोहाडे तालुका समन्वयक यांनी केलं. कृषी विभागाचे विविध योजना सोबतच महाविस्तार अप्स ,गोपीनाथ मुंडे



सानुग्रह अपघात विमा योजना इत्यादी विषयी तांत्रिक माहिती श्री आदर्श मेश्राम उपकृषि अधिकारी नवेगाव बांध यांनी दिली.

श्री निंबेकर कृषि सेवक यांनी एकूण १२५ शेतकऱ्यांनी प्रत्येकी एक याप्रमाणे सव्वाशे एकर जमीन यावर्षी नैसर्गिक शेतीमध्ये कशाप्रकारे आणली जाईल किंबहूना नैसर्गिक शेती पुढच्या वर्षी कशा प्रकारे करायची या बाबत तांत्रिकपणे सविस्तर मार्गदर्शन केलं. मनिषा शहारे व संगिता किरसान कृषीताई यांनी प्रत्यक्षात जीवामृत, बिजामृत दशपर्णी अर्क कशाप्रकारे तयार करतात या बाबत प्रात्यक्षिक तयार करून दाखविले. विलास गहाणे,सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रास्ताविक तथा शेतकऱ्यांचे आभार मानले. नंतर अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

## बुलढाणा डाक विभागातील ग्रामीण भागात टपाल सेवांना नवे बळ देण्यासाठी बारलिंगा येथे शाखा डाकघराचा शुभारंभ

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : ग्रामीण भागातील नागरिकांना विविध टपाल , विमा आणि वित्तीय सेवा सुलभ व्हाव्यात या उद्देशाने भारतीय डाक विभागाच्या वतीने नविन शाखा डाककघराचे उद्घाटन २७/३/२०२६ रोजी उत्साहात पार पडले. दुसरबीड उपडाकघर अंतर्गत बारलिंगा शाखा डाकघर शाखा डाकघराचा शुभारंभ बुलडाणा विभागाचे डाक अधीक्षक श्री गणेश अंभोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली डाक निरीक्षक श्री गजानन काळे सर यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आले असून या शाखा डाकघराचे उद्घाटन मा. डाक अधीक्षक श्री गणेश आंभोरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.



उद्घाटन प्रसंगी शाखा डाककार्यालयांची सजावट फुगे व रिबीन लावून करण्यात आली होती. या शाखा डाकघरामध्ये बाल आधार सेवा, सुकन्या खाते,बचत खाते तसेच थेट लाभ हस्तांतरण (उइढ) यांसारख्या विविध टपाल सेवा, विमा सेवा आणि वित्तीय सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री निरंजन शुक्ल यांनी केले असून , या वेळी लोणार उपडाकपाल श्री बद्रीनाथ पालवे, सिंदखेड राजा उपडाकपाल श्री शंकर खरात , लोणार उप डाकघर डाक सहाय्यक श्री ज्ञानेश्वर टाले मेहकर डाक निरीक्षक कार्यालयाचे सहाय्यक श्री देवानंद आकाळ तसेच डाक आवेक्षक श्री विष्णू काळुसे व श्री समाधान मोरे सह संबंधित इझच् व इझच् उपस्थित होते.तसेच खैरव/बारलिंगा गट ग्रामपंचायत चे सरपंच पती राजेंद्र गरड बारलिंगा येथील पोलिस पाटील बद्रीनाथ जायभाये पत्रकार दिपक म्हस्के व गावातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी बारलिंगा शाखा डाकघर येथे पहिल्याच दिवशी झजडइ चे १११ खाते उघडण्यात आले

या उपक्रमामुळे गावकऱ्यांना शहरात जाण्याची गरज कमी होऊन वेळ व खर्चाची बचत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली असून ग्रामीण भागात डाक सेवा विस्ताराच्या या उपक्रमामुळे शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे तसेच नागरिकांनी या सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन मा.श्री गणेश अंभोरे साहेबानी अध्यक्षीय भाषण केले

### पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाची ऐतिहासिक कामगिरी

## सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात प्रथमच 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या कार्यक्षेत्रात प्रथमच 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय' हा मानाचा दर्जा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयास प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची दखल घेत हा दर्जा १० वर्षांच्या कालावधीसाठी (नूतनीकरणासह) प्रदान करण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. २२ मे २०२३ च्या नियमांनुसार निर्णय घेण्यात आला आहे.

या दर्जामुळे महाविद्यालयाला संपूर्ण शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक स्वायत्तता प्राप्त होणार आहे. महाविद्यालयाला स्वतःचे अभ्यासक्रम तयार करण्याचा, नवीन पदवी, पदव्युत्तर, पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा अधिकार मिळणार आहे. छर- ींळेपरश्र एर्वीलरींळेप झेश्रळलू २०२० (राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०) अनुषंगाने अभ्यासक्रमात आवश्यक बदल करणेही शक्य होणार आहे.

या दर्जाचा सर्वात महत्त्वाचा लाभ म्हणजे संयुक्त पदवी प्रदान करण्याची सुविधा होय. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यापीठासोबत महाविद्यालयाचे नाव व चिन्ह (लोगो) असणार असल्याने महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख अधिक बळकट होणार आहे.

विशेष म्हणजे, सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असा दर्जा मिळवणारे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय हे पहिलेच महाविद्यालय ठरले आहे. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी समाधान व्यक्त केले आहे.

तसेच संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, उच्च विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, उच्च शिक्षण विभागाचे लेखापरीक्षक प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, मध्य विभागीय सल्लागार समितीचे अध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष संजीव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे व शैक्षणिक कुलसचिव डॉ. आनंद शिंदे यांनीही आनंद व्यक्त केला.

याशिवाय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर व प्र-कुलगुरू लक्ष्मीकांत दामा यांनी महाविद्यालयाचे विशेष अभिनंदन केले आहे.

या यशामुळे महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' हा दर्जा मिळाल्याने महाविद्यालय आता 'लघु विद्यापीठा'च्या दिशेने वाटचाल करू लागले असून, गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित व आधुनिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# चैत्री यात्रेसाठी मंदीर प्रशासन सज्ज : गहिनीनाथ महाराज औसेकर

## चैत्री यात्रेसाठी भाविकांना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध; सहा अतिरिक्त पत्राशेडची निर्मिती


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : चैत्र शुद्ध कामदा एकादशी निमित्त दरवर्षी होणारी चैत्री यात्रा यंदा दि. २९ मार्च रोजी पार पडत असून, यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांचा विचार करून श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीने सर्वंकष नियोजन केले आहे. सुलभ, सुरक्षित व जलद दर्शनासोबतच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यात्रा कालावधीत मंदिरातील पारंपरिक धार्मिक कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात येत आहेत. श्रीरामनवमी निमित्त नवमी दिवशी ह.भ.प. श्रीकांत महाराज पातकर (देहूकर फड - बिद्रीकर मंडळी) यांचे कीर्तन संपन्न झाले. द्वादशीला ह.भ.प. आजरेकर महाराज यांचा नैवेद्य तर त्रयोदशीला ह.भ.प. गुरु बाबासाहेब आजरेकर महाराज यांचे कीर्तन होणार आहे. एकादशीच्या पहाटे श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेची नित्यपूजा अनुक्रमे सदस्य ह.भ.प. प्रकाश जवंजाळ व सदस्य संभाजी शिंदे यांच्या शुभहस्ते सपत्नीक संपन्न होणार आहे.

भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत आपत्कालीन व्यवस्थेची विशेष तयारी करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेची रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह तैनात राहणार असून सिझफायर यंत्रणा, १५७ सीसीटीव्ही कॅमेरे, नियंत्रण कक्ष, वायरलेस प्रणाली, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, बॅग स्कॅनर मशीन, सार्वजनिक सूचना प्रणाली व चौकशी कक्ष कार्यरत ठेवण्यात आले आहेत. तसेच भाविकांसाठी





अपघात विमा संरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य सेवांसाठी पत्राशेड परिसरात तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष सुरू करण्यात आला असून उपजिल्हा रुग्णालयामार्फत दर्शन मंडप येथे आयसीयू सुविधा उपलब्ध ठेवण्यात आले आहे. वैष्णव चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या सहकार्याने मोफत वैद्यकीय सेवा दिली जात असून दोन अद्ययावत रुग्णवाहिका वैद्यकीय पथकासह सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. स्वच्छतेसाठी मंदिर परिसर, दर्शनमंडप व तुकाराम भवन येथील कामे मंदिर कर्मचाऱ्यांमार्फत तर नगरप्रदक्षिणा मार्ग व दर्शनरांग परिसरातील स्वच्छता आउटसोर्सिंग पद्धतीने केली जात आहे. या उपक्रमात स्वकाम सेवा आळंदी व संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी या संस्थांचे सहकार्य लाभत आहे.

अन्नछत्रामध्ये दररोज दुपारी १२ ते २ व रात्री ७ ते ९ या वेळेत अन्नदान सुरू राहणार आहे. तसेच दशमी, एकादशी व द्वादशी दिवशी दर्शनरांगेतील भाविकांना लिंबू सरबत तसेच तांदूळ किंवा साबुदाणा खिचडी/उपीटचे वाटप करण्यात येत आहे. दर्शनरांग व्यवस्थापन अधिक सुसूत्र करण्यासाठी स्कायवॉकपासून पत्राशेडपर्यंत बॅरिकेटिंग करण्यात आले असून कायमस्वरूपी ४ व तात्पुरते ६ असे एकूण १० पत्राशेड उभारण्यात आले आहेत. येथे बसण्याची व्यवस्था, मॅट, थंड पिण्याचे पाणी, तात्पुरते उड्डाणपूल, शौचालये, विश्रांती कक्ष व इतर अनुषंगीक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन कुलर व पंखे बसविण्यात आले आहेत. महिला भाविकांसाठी हिरकणी कक्ष व सॅनिटरी नॅपकिन सुविधा उपलब्ध असून श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू पुरेशा प्रमाणात उपलब्धक करून देण्यात येत आहेत. वेदांता, व्हिडिओकॉन व श्री विठ्ठल-रूक्मिणी भक्तनिवास येथे ३६१ खोल्यांमध्ये सुमारे १६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

दर्शन प्रक्रिया गतिमान ठेवण्यासाठी अनुभवी कमांडोंची नियुक्ती करण्यात आली असून व्हीआयपी दर्शनावर निर्बंध घालण्यात आले आहेत. भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजांची संख्या मर्यादित करून दर्शनाची वेळ सकाळी ६.०० ते रात्री १२.०० अशी वाढविण्यात आली आहे. सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना अधिकाधिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य आमदार रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, प्रणिताताई भालके, व्यवस्थापक संदेश भोसले, लेखाधिकारी मुकेश अनेचा व सर्व विभाग प्रमुख परिश्रम घेत असून, १२०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# जिल्हा परिषद मिशन अंकुर स्पर्धेत कन्या हेरवाडचे सुयश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : जिल्हा परिषद कोल्हापूर (शिक्षण विभाग)आयोजित मिशन अंकुर प्रारंभिक साक्षरता संवर्धन कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या(इयत्ता पहिली व दुसरी) स्पर्धा परीक्षेत कन्या विद्या मंदिर हेरवाड शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे.यशस्वी विद्यार्थिनींना मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांचे हस्ते भेटवस्तू देवून गौरविण्यात आले.




इयत्ता पहिली वर्गाच्या वर्गशिक्षिका ज्योती गुंडा परीट असून शिरोळ तालुका रँक :१६६ शाळांत २४ वा तर दत्तवाड केंद्र रँक १२ शाळांत दुसरा तर अ + श्रेणी -५,अ श्रेणी -८,ब + श्रेणी -७,ब श्रेणी -५ अशी श्रेणी प्राप्त झाली आहे. कु.ऋषिका परशराम कांबळे : ९२ गुण (जिल्हयात ५ वी), कु. शिवन्या विजयकुमार पर्वते :९२ गुण (जिल्ह्यात ५ वी),कु.ज्ञानेश्वरी गोरखनाथ माने : ९० गुण (जिल्हयात ६ वी),कु.मैथिली सूरज घोडके :९० गुण (जिल्ह्यात ६ वी),कु.ऋचा मुकुंद पुजारी :९० गुण (जिल्ह्यात ६ वी),कु.ईश्वरी दादासो सुतार :८८ गुण (जिल्हयात ७ वी),कु.सिध्दी स्वप्नील देबाजे :८८ गुण (जिल्ह्यात ७ वी),कु.श्रेया किसन वाघे : ८६ गुण (जिल्हयात ८ वी),कु.अनन्या विजय आलासे :८० गुण (जिल्ह्यात ११ वी),कु.अन्वी सागर उगारे :८० गुण (जिल्हयात ११ वी),कु.रावी राहूल पाटील: ८० गुण(जिल्ह्यात ११ वी), कु.सान्वी सागर अपराज : ८० गुण (जिल्ह्यात ११ वी),कु.वेदिका विजयकुमार देसाई :८० गुण (जिल्ह्यात ११वी)

**दुसरी इयत्तेत कु.हिरकणी बंडगर जिल्ह्यात दुसरी**

इयत्ता दुसरी वर्गाच्या वर्गशिक्षिका गीता अभय ढवळे असून शिरोळ तालुका रँक :१६६ शाळांत २० वा तर दत्तवाड केंद्र रँक :१२ शाळांत पहिला क्रमांक आला असून अ+ श्रेणी -४,अ श्रेणी -१०, ब+श्रेणी -६,ब श्रेणी -७ अशी श्रेणी प्राप्त झालेली आहे.इयत्ता दुसरीतील यशस्वी विद्यार्थिनी पुढील प्रमाणे :कु.हिरकणी हरीश बंडगर :९८ गुण (जिल्हयात दुसरी),कु.सादिया अतिक मुल्ला :९२ गुण (जिल्ह्यात पाचवी),कु.ओवी बिरु देबाजे :९२ गुण (जिल्ह्यात पाचवी),कु.आयेशा अल्ताफ गलगले :९० गुण (जिल्ह्यात सहावी), कु.अलविरा दस्तगीर मुल्ला :८८ गुण (जिल्ह्यात सातवी),कु.अनुष्का संतोष माळी :८८ गुण (जिल्ह्यात सातवी), कु.सानवी सागर उगारे :८६ गुण (जिल्हयात आठवी),कु.दिविजा दादासो बेडक्याळे :८४ गुण (जिल्ह्यात नववी), कु.राधिका सचिन जाधव :८४ गुण (जिल्ह्यात नववी),कु.गौरी अभिजीत अकिवाटे :८२ गुण (जिल्ह्यात दहावी), कु.माहिरा जावेद गलगले :८२ गुण (जिल्हयात दहावी),कु.श्रीनीती किरण पाटील :८२ गुण (जिल्हयात दहावी), कु.श्रेया निलेश माने :८२ गुण (जिल्ह्यात दहावी),कु.वैदेही दिपक कुन्नुरे :८० गुण (जिल्हयात अकरावी)

गट शिक्षण अधिकारी भारती कोळी,केंद्रप्रमुख सुभाष कुरुंदवाडे यांचे प्रोत्साहन लाभले.यशस्वी विद्यार्थिनींचे व मार्गदर्शकांचे कौतुक होत आहे.

# सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्थेने पाणीपट्टी उजनी जलसंपदा विभागाकडे केली अदा

पंढरपूर/प्रतिनिधी : सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्थेने उजनी जल संपादन विभागाची असलेली पाणीपट्टी जमा केली आहे

पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्था कार्यरत असून ही संस्था रोपळे शाखा क्रमांक १२ अंतर्गत येते ही संस्था अनेक वर्षापासून चेअरमन चंद्रकांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित येथील लाभधारक शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करण्याचे काम करत आहे.

मागील आठवड्यात या संस्थेच्या वतीने उन्हाळा हंगाम पूर्व आढावा बैठक घेण्यात आली होती या बैठकीमध्ये प्रामुख्याने पाणी मागणी करणे ,व अर्ज भरणे, पाणीपट्टी जमा करणे आदी विषयावर चर्चा करण्यात आली होती यावर संस्थेचे चेअरमन सचिव व संचालक मंडळ लाभधारक शेतकरी या सर्वांच्या सहयोगाने उन्हाळी हंगाम २०२४-२ ०२५ व रब्बी हंगाम २०२५-२०२६ पाणीपट्टी पोटी आज शनिवार २८ मार्च रोजी जवळपास २ लाख ४० हजार रुपये पाणीपट्टी जमा केली यावेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत कदम सचिव मारुती लवंड, भीमा कालवा विभाग रोपळे शाखेचे शाखा अधिकारी पी .टी.माने ,नारायण चिंचोली चे उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, संचालक जनार्दन कंदारे, आप्पासाहेब वाघमोडे, मारुती वाघमोडे, बाभुळगाव पाणी वापर संस्थेचे चेअरमन दशरथ चव्हाण, हनुमंत खरात आदी मान्यवर संस्थेचे पदाधिकारी , लाभधारक शेतकरी उपस्थित होते. यावेळी सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्थेच्या वतीने शाखा अधिकारी माने यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलताना शाखा अधिकारी माने म्हणाले की सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्था नियमित पाणीपट्टी भरत असून या संस्थेचे जलसंपदा विभाग उजनी यांना नेहमीच मोठे सहकार्य मिळत आहे असे सहकार्य भविष्यात ही करावे असे अपेक्षा व्यक्त करत संस्थेचे चेअरमन ,सचिव, संचालक मंडळ व लाभधारक शेतकरी यांचे आभार मानले.

# चैत्री यात्रेसाठी लाखो भाविक पंढरपुरामध्ये दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : चैत्री यत्रीचा एकादशी सोहळा उद्या दिनांक २९ रविवार रोजी सोहळा साजरा होणार आहे. यहा सोहळ्यासाठी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूर शहरांमध्ये लाखो भाविक दाखल झाले आहे. मात्र मंदिर परिसरात छोट्या व्यवसायिकांनी अतिक्रमण केल्याची दिसून येत आहे. चैत्री यात्रेच्या पार्श्वभूमी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सर्व शासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन येणाऱ्या भाविकांना सुख सुविधा चांगल्या प्रमाणात द्याव्या यासाठी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी त्यांनी सूचना दिले आहेत. मात्र मंदिर परिसरामध्ये छोट्या व्यापाऱ्यांनी अतिक्रमणाची केली असलेली दिसून येत आहे. तशाही अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. चैत्री यात्रेसाठी लाखो भाविक पंढरपुरामध्ये दाखल झाले असून एकादशीचा सोहळा उद्या रविवारी साजरा होणार आहे. मात्र मंदिर परिसरात अतिक्रमणाचा वेळ का असल्यामुळे भाविकांना रस्त्यावरून जाताना अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे भाविकातून तीव्र संताप व्यक्त होऊ लागला आहे. अधिकाऱ्यांनी एसी मध्ये बसून बैठकीय नियोजन केले आहे. असे नागरिकांतून बोलले जात आहे.

# विहीर खोदकाम करणाऱ्या गायकवाड कुटुंबातील मुलगी पोलिस भरतीत प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी



मुळ कर्नाटक राज्यातील साहेबराव गायकवाड व सौ. अनिता गायकवाड हे वडार समाजातील कष्टकरी दांपत्य कामधंद्याच्या निमित्ताने महाराष्ट्रात आले आणि आपल्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी केवळ संसारच उभा केला नाही, तर आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीही मोठा आदर्श निर्माण केला आहे. त्यांची मुलगी सोनाली गायकवाड हिने पालघर जिल्हा पोलिस भरतीत विमुक्त जाती प्रवर्गातून प्रथम क्रमांक पटकावत कुटुंबाचे नाव उज्वल केले आहे.

साहेबराव गायकवाड व अनिता गायकवाड हे सुरुवातीला अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी येथे वास्तव्यास होते. काही दिवसांनंतर ते नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथे स्थायिक झाले. गेल्या वीस वर्षांपासून त्यांनी नैताळे परिसरात विहिरी खोदण्याचे कष्टाचे काम करत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवायचे नाही, असा ठाम निर्धार केला.साहेबराव गायकवाड यांनी स्वतः खडतर परिस्थितीत एस.वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण घेतले, मात्र आर्थिक अडचणींमुळे त्यांचे शासकीय नोकरीचे स्वप्न अपूर्ण राहिले. त्यांच्या पत्नी अनिता गायकवाड यांचे शिक्षण केवळ सातवीपर्यंत झाले आहे. तरीही या दांपत्याने शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या मुलांना शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ही शिकवण दिली.

त्यांची मुलगी सोनाली गायकवाड हिने प्राथमिक शिक्षण नैताळे येथील प्राथमिक विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर निफाड येथील न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाच्या वैनतेय विद्यालय व महाविद्यालयात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेत एस.वाय.बी.ए. पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण केला. पुढे शासकीय सेवेत जाऊन देशसेवा करण्याचा निर्धार करत तिने पोलिस भरतीसाठी विशेष प्रशिक्षण घेण्यासाठी अकॅडमीत प्रवेश घेतला.दिवस-रात्र अभ्यास, प्रचंड मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर सोनालीने पालघर जिल्हा पोलिस भरतीत विमुक्त जाती प्रवर्गात प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचे नैताळे परिसरासह सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. वडार समाजातील मुलगी असूनही तिने सर्व समाजाचा अभिमान वाढवला आहे.साहेबराव गायकवाड यांचा मुलगा ईश्वर हाही देशसेवेचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवून प्रयत्नशील असून लवकरच भारतीय सैन्यात भरती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या मुलीचे पोलिस होण्याचे स्वप्न साकार झाल्याने गायकवाड कुटुंब अत्यंत आनंदित असून, एका बापाला आपल्या मुलीच्या यशामुळे जो अभिमान वाटतो, तो त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत आहे प्रत्येक पालक आपल्या मुलांच्या स्वप्नपूर्तीसाठी झटत असतो. साहेबराव गायकवाड यांनीही आपल्या कष्टाच्या बळावर हे स्वप्न साकार करून दाखवले आहे. त्यांच्या या प्रवासातून समाजातील इतर कुटुंबांनाही प्रेरणा मिळत आहे. या यशाबद्दल सोनालीचा नैताळे ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## केदार सावंत, चिवडशेट्टी, वाघे, सातपुते यांची वर्णी

# सोलापूर जिल्हा परिषद सभापती जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा परिषदेच्या २०२६ सभापतीच्या निवडी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्याप्रमाणे सभा वर्षासाठी असणार की अडीच वर्षासाठी यांचीही उत्सुकता आहे.



सोलापूर जिल्हा परिषदेच्या बहुचर्चित विषय समितीच्या सभापतींची नावे भारतीय जनता पक्षाचे आज दिनांक २७ मार्च जाहीर केली त्यामध्ये जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्याकडे अर्थ व बांधकाम, माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांच्याकडे समाज कल्याण, दक्षिण सोलापूरचे रामाप्पा चिवळशेट्टी यांना कृषी व पशुसंवर्धन, करमाळ्यातील अमृता वाघे यांना महिला व बालकल्याण सभापती, संधी दिली आहे . जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांच्याकडे शिक्षण व आरोग्य समितीची सभापती पद सोपवण्यात आले आहे.

आमदार, माजी आमदार आणि वरिष्ठांशी चर्चा करून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सभापतीच्या नावाची घोषणा केली आहे. ही निवड अध्यक्षांनी उपाध्यक्ष यांच्याप्रमाणे सव्वा वर्षासाठी असणार की अडीच वर्षासाठी याची उत्सुकता आहे. या सर्वांची बिनविरोध निवड झाली आहे.

जिल्हा परिषदेच्या इतिहासात भारतीय जनता पक्षाने प्रथमच ६८ पैकी ३८ जागा जिंकून ऐतिहासिक यश मिळवले होते. भाजपचा पहिला जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून बार्शीच्या दीपक वैद्य यांना संधी देण्यात आले आहे, तर उपाध्यक्ष हे उत्तर सोलापूर तालुक्यातील इंद्रजीत पवार यांच्याकडे सोपवण्यात आलेले आहे, आता सभापती पदांची उत्सुकता होती.

जिल्हा परिषदेची अर्थ व बांधकाम समितीचे सभापती हे पारंपारिक पद्धतीनुसार उपाध्यक्षाकडे जाते, त्यामुळे इंद्रजीत पवार यांच्याकडे अर्थ व बांधकाम समितीची सभापती पद केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग जिल्हा परिषद गटातून निवडून आलेले रामाप्पा चिवळशेट्टी यांना कृषी व पशुसंवर्धन समितीच्या सभापतीची संधी देण्यात आले आहे. ती उपाध्यक्ष पदासाठी इच्छुक होते मात्र आता सभापती पद मिळाल्याने त्यांची अध्यक्षपदाची दावेदारी संपल्यात जमा आहे. माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांच्याकडे समाज कल्याण सभापतीची धुरा देण्यात आली आहे. त्या माळशिरस मधील दहिगाव गटातून निवडून आलेले आहेत. पत्नीला सभापती करून राम सातपुते यांनी सत्तेच्या माध्यमातून तालुक्यातील लोकांची कनेक्ट राहील, याची काळजी घेतल्याची दिसून येत आहे मोहिते पाटील यांना विधानसभेच्या निवडणुकीपासून टोकाचा विरोध करणारे सातपुते यांच्या पाठीशी सभापती पदाच्या माध्यमातून सत्तेचे भांडवल देण्याचा प्रयत्न पालकमंत्री गोरे यांनी केला आहे.

माढा तालुक्यातील टेंभुर्णी गटातून विजयी झालेली ॲड अमृता नागनाथ वाघे यांच्याकडे महिला व बालकल्याण समितीची सभापती पद देण्यात आलेली आहे त्यामुळे विधानसभे पासून गेलेल्या माजी आमदार बबनराव शिंदे घाटाला सत्तेची ऊर्जा मिळाली आहे. भारतीय जनता पक्षाचे पश्चिम विभागाची जिल्हाध्यक्ष चेतनशील केदार सावंत यांनाही सभापती पदाची संधी देण्यात आलेली आहे. त्यांच्याकडे शिक्षण व आरोग्य समितीची सभापती पद सोपवण्यात आलेली एकंदरीतच सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे धाराशिव लोकसभा मतदारसंघात तर, उपाध्यक्षपदी सोलापूर, तर तीन महत्त्वाची सभापती पदे ही माढा लोकसभा मतदारसंघात गेले आहेत.

# सोलापूर जिल्हा परिषद सेवाकर्मी कार्यक्रमात राज्यात आदर्श ठरली

## मुख्यमंत्री यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्यालय प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमाच्या गुणांकनात सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना आज रोजी मंत्रीमंडळ सभागृह, सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे उत्कृष्ट कार्यालय प्रमुख म्हणून प्रशस्तिपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




जिल्हा परिषदेने सेवाकर्मी कार्यक्रमातील विविध निकषांवर १०० पैकी ८० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. ज्येष्ठता सूची, पदोन्नती व सरळसेवा नियुक्तीची स्थिती, बिंदुनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, ळत्रङ्खढ पोर्टलवरील प्रशिक्षण पूर्णता आणि सेवापुस्तक अद्ययावत करणे या सर्व बाबींमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचा सेवाकर्मी कार्यक्रमातील आदर्श ठसा

ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यांकन करण्यासाठी सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यातील इतर सर्व जिल्हा परिषदांना मागे टाकत प्रथम क्रमांक मिळवला.

गुणांकन अहवालानुसार:

- ज्येष्ठता सूची : ५७ पैकी सर्व संवर्गांची अद्ययावत ज्येष्ठता सूची प्रसिद्ध (१०/१० गुण).
- पदोन्नती नियुक्ती : मंजूर ९५९ पदांपैकी ८२० कार्यरत, रिक्त पदांचे प्रमाण १४.४९% असूनही कार्यवाही उत्कृष्ट (१०/१० गुण).
- सरळसेवा नियुक्ती : मंजूर १३,००७ पदांपैकी ११,४२५ कार्यरत, रिक्त पदांचे प्रमाण १२.१६% (१०/१० गुण).
- बिंदुनामावली प्रमाणीकरण : ५७ पैकी ५५ संवर्गांची बिंदुनामावली प्रमाणित (९४.७४%) (१०/१० गुण).
- अनुकंपा नियुक्ती : उपलब्ध १६८ पदांवर सर्व नियुक्त्या पूर्ण (१०/१० गुण).
- ळत्रङ्खढ पोर्टल प्रशिक्षण : १२,१२७ कर्मचाऱ्यांपैकी सर्वांचे रजिस्ट्रेशन पूर्ण, त्यापैकी ९५.१०% कर्मचाऱ्यांनी ५ कोर्स पूर्ण केले (१०/१० गुण).
- सेवापुस्तक अद्ययावत : १२,१२७ पैकी १२,०३९ सेवापुस्तके अद्ययावत (९९.२७%) (२०/२० गुण).

**सोलापूर जिल्हा परिषदेने १०० पैकी ८० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला; सोलापूर जिल्हा परिषदेचा राज्यस्तरीय गौरव**

या सर्वांमुळे सोलापूर जिल्हा परिषदेने १०० पैकी ८० गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलदीप जंगम यांच्या नेतृत्वाखालील ही कामगिरी केवळ सोलापूर जिल्हा परिषदेपुरती मर्यादित नसून राज्यातील इतर जिल्हा परिषदांसाठीही आदर्श ठरली आहे.

**महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमातील पारदर्शकता, शिस्तबद्धता आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर दिलेला भर यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेने प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा ठसा उमटला व राज्यात पहिला क्रमांक मिळवला. जिल्हा परिषदेने केलेली ही कामगिरी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या सांघिक कामाचे यश आहे. हा पुरस्कार मिळाला याचा आनंद आहे, परंतु आपली जबाबदारी अधिक वाढलेली असून पुढे असेच काम करत राहू याची खात्री ही आहे.**

**– श्री. कुलदीप जंगम (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर)**

# गोरेगाव येथे चैत्र नवरात्री अष्टमी निमित्त विशेष ललिता सहस्त्रनाम कुंकूमार्चन सेवा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : नागरी निवारा परिषद,गोरेगाव पूर्व येथे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ आध्यत्मिक विकास व बालविकास केंद्र,(दिंडोरी प्रणित )यांच्या वतीने नागरी निवारा परिषद,प्लॉट नं.६,गणेश मंदिर येथे,चैत्र नवरात्री अष्टमी निमित्त विशेष ललिता



सहस्त्रनाम कुंकूमार्चन सेवा मोठया उत्साहात संपन्न



झाली.यावेळी असंख्य महिलानी त्यांच्या कुलदेवीचा टाक,फोटो,मूर्ती वर कुंकूमार्चन करून कुलस्वामिनीचा आशीर्वाद घेतला.राम नवमी निमित्ताने समुहिक रामरक्षा व हनुमान चालीसा पठण विशेष सेवा करण्यात आली. ज्येष्ठ सेवेकरी सुनील पडवळ व श्रीधर कडू यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सेवा खूप उत्साहात पार पडली.

# पंढरपूर, सांगोला, मंगळवेढासाठी पिण्याचे पाणी उजनीतून मे महिन्यात सोडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या उन्हाळा जाणवू लागला आहे त्यामुळे नागरिकांना पिण्याची पाण्याची गरज भासू लागली आहे. म्हणून उजनी धरणा मधून मे महिन्यामध्ये पंढरपूर सांगोला मंगळवेढा ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची सोडण्यासाठी उजनी धरणातून बैठकीत निर्णय घेण्यात आला .

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभियंता यांच्या मार्गाने मीटिंग घेण्यात आली. उजनी धरणातील ग्रामीण भागासाठी पिण्याची पाण्याची सोडण्यासाठी भीमा नदीत पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा व सन्मित्र ग्रुप यांच्या वतीने श्री रामनवमी निमित्त शुभ यात्रा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शुक्रवार दिनांक २७/३/२०२६ रोजी बारा वाजता काळा मारुती चौक पंढरपूर येथून प्रभू श्रीराम चंद्राची यांची भव्य शोभयात्रा काढण्यात आली




यावेळी भाजप युवा मोर्चा माझ्या अध्यक्ष विदुल आढळराव निलेश गोलू लकेरी प्रशांत बाबा धुमाळ सतीश सासवडकर विजय भैया दहिवडे अजय देवगडे अक्षय सासवडकर आदित्य भोसले अक्षय सोनू नायकुडे सागर कांबळे ऋषिकेश वाघमोडे कृष्णा खंडागळे आकाश पोळ कुणाल कोरे कृष्णा रे तोंड ओंकार डोंकी दर्शन हदटराव पदाधिकारी संमती ग्रुपचे सहकारी उपस्थित होते भाजप युवा मोर्चा व संमती ग्रुपच्या स्तोत्रमाने पंढरपुरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# खामसवाडी येथील डॉ. प्रमिला गुंड यांना मुंबई येथे एमबीबीएस पदवी प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

- **पदवी प्रदान समारंभ मुंबई येथे षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आला होता.**
- **वडील श्री.जगन्नाथ नामदेव गुंड हे धाराशिव जिल्हा पोलीस दलात कार्यरत आहेत.**
- **मोठी बहिण डॉ प्रियांका गुंड ही एम.बी.बी.एस, एम.एस झाली आहे. व सध्या सेवा ग्राम मेडिकल कॉलेज वर्धा येथे कार्यरत आहे.**
- **पोलीस कुटुंबात वैद्यकीय क्षेत्राचा कसलाही गंध नसताना दोन्ही मुली डॉक्टर झाल्या आहेत.**

हनुमंत पाटुळे : खामसवाडी/ दि.२८(प्रतिनिधी) खामसवाडी येथील रहिवासी व सध्या धाराशिव जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. जगन्नाथ नामदेव गुंड यांची द्वितीय कन्या डॉ. प्रमिला जगन्नाथ गुंड हिने नामांकित जे. जे. मेडिकल कॉलेज मुंबई येथे एम.बी.बी.एस शिक्षण पूर्ण करुन ईंटरशिप पुर्ण केली आहे. तिच्या पदवी प्रदान समारंभाचे आयोजन मुंबई येथे षण्मुखानंद सभागृहात करण्यात आले होते.

यावेळी डॉ. प्रमिला गुंड यांच्या वडिलांनी सांगितले की, नौकरी मुळे सतत बदली होत असताना सतत शाळा बदलावी लागायची जिल्हा परिषद शाळा ढोकी येथे प्राथमिक शिक्षण व नवोदय विद्यालय तुळजापूर येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण करून नंतर मुंबई येथे एम.बी.बी.एस. साठी प्रवेश मिळवला व यश संपादन केले.पोलीस कुटुंबात वैद्यकीय क्षेत्राचा कसलाही गंध नसताना दोन्ही मुली डॉक्टर झालेल्या आहेत. हे




आमच्यासाठी व खामसवाडी गावासाठी अतिशय अभिमानाचा विषय आहे.

डॉ. प्रमिला गुंड यांची मोठी बहिण डॉ. प्रियांका गुंड एम.बी.बी.एस, एम. एस झाली आहे. व सध्या सेवा ग्राम मेडिकल कॉलेज वर्धा येथे कार्यरत आहे. गुंड यांच्या दोन्हीही कन्या यांनी वैद्यकीय सेवेत शिक्षण पुर्ण करुन पदवी प्राप्त केल्याबद्दल ग्रामस्थांसह सर्व स्तरातून त्यांचे व कुटुंबाचे अभिनंदन होत आहे.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन

# विद्यार्थ्यांनो कठोर परिश्रम करा, यश नक्की मिळते : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विद्यार्थ्यांनो चिकाटी, जिद्द, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून अभ्यास करा यश नक्की मिळेल, परंतु त्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात आयोजित केलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते, व्यासपीठावर संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी उपस्थित होते.




पुढे बोलताना ते म्हणाले की, क्रिस्टोयानो रोनाल्डो आणि लिओनेल मेसी, नीरज चोप्रा या खेळाडूंनी कठोर परिश्रम करून सराव आणि सातत्य यांच्या जोरावर जगात आपले वेगळे स्थान निर्माण केले. विद्यार्थ्यांनी देखील केवळ अभ्यासातच नव्हे, तर क्रीडा आणि इतर उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेऊन यश मिळवावे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला, पारितोषिकाचे अहवाल वाचन प्रा राजशेखर पवार, मनीषा शिंदे, भीम सोनकांबळे, सोनाली कटकधोंड व सौरभ भस्मे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले.

कार्यक्रमयशस्वीतेसाठी शरणय्या मसुती, बसवराज कामाठी, प्राची गणेचारी, डॉ बाळासाहेब पाटील, मधुबाला लोणारी, शितल फुटाणे, हर्षदा गायकवाड, विद्याश्री वाले यांनी प्रयत्न केले.

### एम कॉम परीक्षेत प्रथम आलेल्या कु. प्रियंका गोंडाळ हिचा सत्कार..

**कल्याणशेट्टी महाविद्यालय अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रातील विद्यार्थिनी कुमारी प्रियंका गोंडाळ हिने एम कॉम च्या परीक्षेत ७९.६७ टक्के गुण मिळवून विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळविला, त्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने तिचा गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

### गुणवंत प्राध्यापकांचा झाला सत्कार

**आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ शितल झिंगाडे- भस्मे, एन एस एस उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, ग्रंथ लेखिका प्राची गणेचारी, आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध वाचल्याबद्दल प्रा सौरभ भस्मे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.**

# घरगुती वादातून पत्नीची निर्घृण हत्या; पडघा पोलिसांकडून पती अटकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पती-पत्नीतील सततच्या घरगुती वादातून पतीने पत्नीची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी पडघा पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून न्यायालयाने ३० मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. निर्मला गोरखनाथ वाघे (वय २७) असे मृत महिलेचे नाव असून त्या भिवंडी तालुक्यातील वाहुली, कासपाडा येथेवास्तव्यास होत्या. तर गोरखनाथ अंकुश वाघे (वय २५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती-पत्नीमध्ये नेहमीच घरगुती कारणांवरून वाद होत असत. या वादाचा राग मनात धरून आरोपीने पत्नीचा काटा काढण्याचा कट रचला. दिनांक २७ मार्च २०२६ रोजी आरोपीने पत्नी निर्मला हिला मोटारसायकलवरून फिरायला नेण्याचा बहाणा करून पडघा जवळील कांदळी परिसरातील कोंकणकट्टा हॉटेलच्या अलीकडे असलेल्या डोंगराळ व निर्जन ठिकाणी नेले. तेथे एकांत साधून आरोपीने पत्नीच्या अंगावरील ओढणीने तिचा गळा आवळून निर्घृण हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पडघा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला व आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, पडघा पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता ३० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अधिक तपास पडघा पोलीस करीत आहेत.